-२३-

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक एमएससी १९७०/२२०००१ -डब्ल्यु,
सचिवालय, मुंबई -३२, 26 ऑक्टोबर' ७०.

परिपत्रक :-
= = = = = = =

वजन व मापांच्या व्यवहारांमध्ये दशमान पध्दतीचा वापर करणे ही बाब कायदेशीररीतीने शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार महसूल व वन विभागामध्ये मुख्यत: जमिनीचे क्षेत्र दशमान परिमाणात लिहीणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती वेळोवेळी निदर्शनास आणूनसुध्दा अद्यापही ब-याचशा कार्यालयांतून त्यांच्या नेहमींच्या व्यवहारात (जमिनीच्या क्षेत्राचे बाबतीत) एकर, गुंठे या जुन्या पध्दतीचा वापर केला जातो. दशमान पध्दतीचा अंमल आता कायदेशीर झाल्यामुळे यापुढे कोणत्याही कार्यालयातून कोणत्याही व्यवहारात दशमान पध्दतीचा वापर करणे कायद्याने बंधनकारक आहे. म्हणून शासनाकडून पुन्हा एकदा असा निदेश देण्यांत येत आहे की, शासन व्यवहारात ज्या ज्या वेळी जमिनीचे क्षेत्र दाखवावयाचे असेल त्या वेळी सदरहू क्षेत्र हेक्टर्स-आर मध्ये असे दाखवावे. जुने परिमाण एकर-गुंठे हे कंसात दाखवावे. यापुढे या परिपत्रकाचे पालन काटेकोरपणे करण्यांत यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

व.शं.कुलकर्णी

अवर सचिव, महसूल व वन विभाग.

OFFICE OF THE COLLECTOR,
RATNAGIRI.
19 NOV 1970